सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १४ नोव्हेंबर २०१८

कोल्हापूर : फिरते विधी सेवा केंद्र आणि लोकअदालतच्या उद्घाटनप्रसंगी नंदकुमार काटकर, ए. व्ही. देशपांडे, उमेशचंद्र मोरे, अभयकुमार साळुंखे आदी मान्यवर.

फिरत्या विधी सेवा केंद्रामुळे जलद न्याय

नंदकुमार काटकर : मोबाईल कोर्टचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. १३ : न्यायालयातील खटल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे न्याय मिळण्याच्या प्रक्रियेत वेळ, पैसा आणि श्रम खर्ची पडतो; पण 'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेमुळे फिरते विधी सेवा केंद्र आणि लोकअदालत आज तुमच्या दारी आले आहे. यामुळे न्याय मिळण्यास मदत होईल. हा उपक्रम अतिशय यशस्वी होत आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर यांनी केले. कोल्हापूर विधी सेवा प्राधिकरण आयोजित 'न्याय आपल्या दारी' कार्यक्रमात 'फिरत्या लोकअदालत'च्या (मोबाईल कोर्ट) उद्घाटनवेळी ते बोलत होते. स्वामी विवेकानंद संस्थेचे अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

या वेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी काटकर म्हणाले, ''लोकन्यायालयाच्या पुढचे पाऊल म्हणजे फिरते न्यायालय आहे. फिरत्या न्यायालयामुळे कमी खर्चात, कमी वेळेत न्याय मिळण्यास मदत होईल. सर्वांनी सकारात्मक दृष्टीने पाहून आपले खटले तडजोड करून मिटविण्यासाठी पुढे आले पाहिजे.''

या वेळी निवृत्त जिल्हा न्यायाधीश ए. व्ही. देशपांडे, कोल्हापूर विधी सेवा प्राधिकरणचे सचिव उमेशचंद्र मोरे प्रमुख पाहुणे होते. हा कार्यक्रम स्वामी विवेकानंद संस्थेच्या बापूजी साळुंखे स्मृती भवन येथील सभागृहात झाला.

कार्यक्रमास विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर, करवीर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन घाटगे, वैभव कांबळे, हरी व्हनमोरे, पंढरीनाथ मांढरे आदी उपस्थित होते. S

लोकमत कोल्हापूर, बुधवार, दि. १४ नोव्हेंबर २०१८

'फिरते विधि सेवा'ने जलद न्याय मिळण्यास मदत

काटकर : 'न्याय आपल्या दारी' कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : न्यायालयातील खटल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे; त्यामुळे न्याय मिळण्याच्या प्रक्रियेत वेळ, पैसा, श्रम खर्ची लागतो आहे; पण न्याय आपल्या दारी या संकल्पनेमुळे फिरते विधि सेवा केंद्र व लोक अदालत आज तुमच्या दारी आले आहे, या फिरते लोकन्यायालयातून जलद न्याय मिळण्यास मदत होते; त्यामुळे हा उपक्रम यशस्वी होत आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर यांनी केले.

कोल्हापूर विधिसेवा प्राधिकरणातर्फे मंगळवारी स्वामी विवेकानंद संस्थेच्या बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथील सभागृहात 'न्याय आपल्या दारी' कार्यक्रमात फिरते लोक अदालत (मोबाईल कोर्ट)च्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद संस्थेचे अभयकुमार साळुंखे होते.

निवृत्त जिल्हा न्यायाधीश ए. व्ही. देशपांडे म्हणाले, नागरिकांनी आपसातले वाद या लोकन्यायालयात सोडवावेत. आपले वाद संपुष्टात आणून बाहेर गेल्यानंतर या लोकन्यायालयाची माहिती इतरांना द्यावी; त्यामुळे नागरिकांचा मोलाचा वेळ वाचेल. विधि सेवा प्राधिकरणचे सचिव उमेशचंद्र मोरे यांनी प्रास्ताविकात 'न्याय आपल्या दारी' या योजनेअंतर्गत 'फिरते लोक अदालत' उपक्रमाचा हेतू सांगितला. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर, करवीर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन घाटगे, बालविकास अधिकारी वैभव कांबळे, विधिसेवा प्राधिकरणचे सदस्य हरी व्हनमोरे, पंढरीनाथ मांढरे तसेच अंगणवाडी सेविका, पक्षकार, आदींसह विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. ॲड. बी. एम. पाटील यांनी सूत्रसंचालन, तर ॲड. किरण खटावकर यांनी आभार मानले.

खटले तडजोडीने मिटविण्यासाठी पुढे या

काटकर म्हणाले, लोक न्यायालयाच्या पुढचे पाऊल म्हणजे फिरते न्यायालय आहे. त्यामुळे कमी खर्चात, कमी वेळेत न्याय मिळण्यास मदत होईल. सहनशीलता कमी झाल्यामुळे, वादामुळे शक्ती व वेळ वाया जातो या गोष्टी आपल्या लक्षात येत नाहीत. यामुळे देशाचे पण नुकसान होते; त्यासाठी सर्वांनी सकारात्मक दृष्टीने पाहून खटले तडजोड करुन मिटविण्यासाठी पुढे आले पाहिजे.

लोकमत कोल्हापूर, बुधवार, दि. १४ नोव्हेंबर २०१८

'फिरते विधि सेवा'ने जलद न्याय मिळण्यास मदत

काटकर : 'न्याय आपल्या दारी' कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : न्यायालयातील खटल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे; त्यामुळे न्याय मिळण्याच्या प्रक्रियेत वेळ, पैसा, श्रम खर्ची लागतो आहे; पण न्याय आपल्या दारी या संकल्पनेमुळे फिरते विधि सेवा केंद्र व लोक अदालत आज तुमच्या दारी आले आहे, या फिरते लोकन्यायालयातून जलद न्याय मिळण्यास मदत होते; त्यामुळे हा उपक्रम यशस्वी होत आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी नंदकुमार काटकर यांनी केले.

कोल्हापूर विधिसेवा प्राधिकरणातर्फे मंगळवारी स्वामी विवेकानंद संस्थेच्या बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथील सभागृहात 'न्याय आपल्या दारी' कार्यक्रमात फिरते लोक अदालत (मोबाईल कोर्ट)च्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद संस्थेचे अभयकुमार साळुंखे होते.

निवृत्त जिल्हा न्यायाधीश ए. व्ही. देशपांडे म्हणाले, नागरिकांनी आपसातले वाद या लोकन्यायालयात सोडवावेत. आपले वाद संपुष्टात आणून बाहेर गेल्यानंतर या लोकन्यायालयाची माहिती इतरांना द्यावी; त्यामुळे नागरिकांचा मोलाचा वेळ वाचेल. विधि सेवा प्राधिकरणचे सचिव उमेशचंद्र मोरे यांनी प्रास्ताविकात 'न्याय आपल्या दारी' या योजनेअंतर्गत 'फिरते लोक अदालत' उपक्रमाचा हेतू सांगितला. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर, करवीर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन घाटगे, बालविकास अधिकारी वैभव कांबळे, विधिसेवा प्राधिकरणचे सदस्य हरी व्हनमोरे, पंढरीनाथ मांढरे तसेच अंगणवाडी सेविका, पक्षकार, आदींसह विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. ॲड. बी. एम. पाटील यांनी सूत्रसंचालन, तर ॲड. किरण खटावकर यांनी आभार मानले.

खटले तडजोडीने मिटविण्यासाठी पुढे या

काटकर म्हणाले, लोक न्यायालयाच्या पुढचे पाऊल म्हणजे फिरते न्यायालय आहे. त्यामुळे कमी खर्चात, कमी वेळेत न्याय मिळण्यास मदत होईल. सहनशीलता कमी झाल्यामुळे, वादामुळे शक्ती व वेळ वाया जातो या गोष्टी आपल्या लक्षात येत नाहीत. यामुळे देशाचे पण नुकसान होते; त्यासाठी सर्वांनी सकारात्मक दृष्टीने पाहून खटले तडजोड करून मिटविण्यासाठी पुढे आले पाहिजे.